**॥श्री स्वामी सामर्थ ॥**

---

## ॥श्री रेणुका अष्टक ॥

---

लक्षकोटी चंडकीर्ण सुप्रचंड विलपती ।अंब चंद्रवदनबिंब दिप्तमाझी लोपती ।
सिंह शिखर अचळवासी मूळपीठनायका ।धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष-रेणुका ॥ १ ॥

आकर्ण अरुणवर्ण नेत्र, श्रवणि दिव्य कुंडले ।डोलताति पुष्पहार भार फार दाटले ।
अष्टदंडि, बाजुबंदि, कंकणादि, मुद्रिका, ।धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष-रेणुका ॥ २ ॥

इंद्रनीळ,पद्मराज, पाचू हार वेगळा ।पायघोळ बोरमाळ, चंद्रहार वेगळ।
पैंजणादि भूषणेंचि लोपल्याति पादुका ।धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष-रेणुका ॥ ३ ॥

इंद्र, चंद्र, विष्णु, ब्रह्म, नारदादि वंदिती ।आदि अंत-ठावहीन आदि शक्ति भगवती ।
प्रचंड चंड मुंड खंड विखंडकारि अंबिका ।धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष-रेणुका ॥ ४ ॥

पर्वताग्रहवासि पक्षी 'अंब अंब ' बोलती ।विशाल शालवृक्ष रानिं भवानि ध्यानि डोलती ।
अवतार-कृत्यसार जड-मुढादि तारका ।धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष-रेणुका ॥ ५ ॥

अनंत ब्रह्मांड कोटिं, पूर्वमुखा बैसली ।अनंत गुण, अनंत शक्ति, विश्वजननी भासली ।
सव्यभागी दत्त, अत्रि, वामभागिं कालिका ।धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष-रेणुका ॥ ६ ॥

पवित्र मातृ-क्षेत्र-धन्य वासपुण्य आश्रमी ।अंब दर्शनासि भक्त-अभक्त येतीं आश्रमी ।
म्हणुनि विष्णुदास नीज लाभ पावला फुका ।धर्म-अर्थ-काम-मोक्ष कल्पवृक्ष-रेणुका ॥ ७॥

॥इति श्री रेणुका अष्टक संपूर्ण ॥

---

॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥
॥ श्री स्वामी समर्थार्पण मस्तु॥